
दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता




vadalvartanews@gmail.com
संपादक : अजय भांगे
https://epaper.vadalvarta.com


बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● रविवार दि.१८ जानेवारी २०२६ ● 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष ३ रे ● अंक १४५ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi ● Sunday 18 January 2026 ● 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 3rd ● Issue 145 ● Pages 4 ● Rate 4 Rs

# देवाच्या मनात असेल तर आपला महापौर होईल:ठाकरेंचं सूचक विधान

## विजयाचं श्रेय स्वत:कडे न घेता पूर्णपणे कार्यकर्त्यांच्या चरणी

**मुंबई महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी पुन्हा एकदा आक्रमक भूमिका घेत भाजप आणि शिंदे गटावर जोरदार हल्लाबोल केला आहे. मुंबईतील नवनिर्वाचित नगरसेवकांनी आज 'मातोश्री'वर उद्धव ठाकरे यांची भेट घेतली. यावेळी बोलताना ठाकरे यांनी, आमच्यात आणि भाजपमध्ये मूलभूत फरक आहे. त्यांना वाटतं कागदावरची शिवसेना त्यांनी संपवली, पण जमिनीवरची शिवसेना ते कधीच संपवू शकत नाहीत, असा खणखणीत टोला लगावला. भाजप आणि शिंदे गट जमिनीवर राहू शकत नाहीत, हेच त्यांचं अपयश असल्याचंही त्यांनी सूचित केलं.महापौरपदाबाबत बोलताना उद्धव ठाकरे यांनी सूचक विधान केलं. आपला महापौर व्हावा, हे स्वप्न आहे. देवाच्या मनात असेल तर तेही होईल, असं म्हणत त्यांनी आशा कायम असल्याचं संकेत दिले. मात्र, त्यांनी सत्तेच्या गणितांपेक्षा लढ्याच्या मूल्यांवर अधिक भर दिला. गद्दारी करून जो विजय मिळवला जातो, तो मुंबई गहाण ठेवण्यासाठीच असतो, असा गंभीर आरोप त्यांनी केला. या पापाला मराठी माणूस कधीही माफ करणार नाही, असं ठाम मत त्यांनी व्यक्त केलं.**



दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

या भेटीदरम्यान उद्धव ठाकरे यांनी नवनिर्वाचित नगरसेवकांचं कौतुक करत विजयाचं संपूर्ण श्रेय कार्यकर्त्यांनाच दिलं. या निकालाचे खरे मानकरी तुम्ही सगळे आहात. आम्ही फक्त निमित्त ठरलो, असं म्हणत त्यांनी कार्यकर्त्यांचा गौरव केला. सध्याच्या राजकीय परिस्थितीत जो निकाल लागला, तो अभिमानास्पद असल्याचं मत त्यांनी व्यक्त केलं. सत्तेचा गैरवापर, यंत्रणांचा दबाव आणि साम-दाम-दंड-भेद या सगळ्या गोष्टी असूनही शिवसैनिकांनी जिद्दीने लढा दिला, याचा आपल्याला अभिमान असल्याचं ठाकरे यांनी स्पष्ट केलं.उद्धव ठाकरे यांनी गद्दारीच्या मुद्द्यावरही थेट हल्ला चढवला. गद्दार निघून गेले, पण ते आमची निष्ठा विकत घेऊ शकले नाहीत, असं म्हणत त्यांनी शिंदे गटावर टीका केली. आपण सर्व शिवसैनिकांना मानाचा मुजरा करतो, कारण या लढाईनंतर प्रत्येकाची जबाबदारी अधिक वाढली आहे, असं त्यांनी नमूद केलं. सत्ता आणि पैशाच्या जोरावर राजकारण जिंकता येईल, असा गैरसमज काहींनी करून घेतला, पण निष्ठा आणि जिद्द पैशाने विकत घेता येत नाही, हे या निकालातून पुन्हा सिद्ध झालं, असा टोला त्यांनी लगावला.ठाकरे यांनी सांगितलं की, निवडणूक प्रचारादरम्यान आपण कार्यकर्त्यांना कोणत्याही विशेष सोयी-सुविधा देऊ शकलो नाही. आपल्याकडे तन-मन आहे, त्यांच्याकडे फक्त धन आहे, असं म्हणत त्यांनी संघर्षातील तफावत अधोरेखित केली. तरीही कार्यकर्त्यांनी केवळ शक्ती आणि आत्मविश्वासाच्या जोरावर विरोधकांना घाम फोडला, असं त्यांनी सांगितलं. हीच ताकद भविष्यातही एकत्र ठेवा, कारण पुढच्या पिढीलाही तुमचा अभिमान वाटला पाहिजे, असा संदेश त्यांनी दिला.उद्धव ठाकरे यांनी विजयाचं श्रेय स्वत:कडे न घेता पूर्णपणे कार्यकर्त्यांच्या चरणी अर्पण केलं. मी तुमच्या चरणी नतमस्तक होऊन हा विजय तुम्हालाच समर्पित करतो, असं भावनिक विधान त्यांनी केलं. ही लढाई अजून संपलेली नाही, तर ती केवळ एका टप्प्यावर आली आहे, असं सांगत त्यांनी कार्यकर्त्यांना सतर्क राहण्याचं आवाहन केलं. जिद्द हा सर्वात मोठा भांडवल असून ती कोणीही विकत घेऊ शकत नाही, याची आठवण त्यांनी करून दिली.भविष्यातील राजकीय संघर्षाबाबत बोलताना उद्धव ठाकरे यांनी आत्मविश्वास व्यक्त केला. जिद्दीच्या जोरावर आणि निष्ठेच्या बळावर आपण पुन्हा जिंकू, असा विश्वास त्यांनी कार्यकर्त्यांना दिला. सत्ता येते-जात असते, पण शिवसेनेची ओळख ही जमिनीवर काम करणाऱ्या शिवसैनिकांमुळे कायम आहे, असं सांगत त्यांनी संघर्ष सुरूच राहणार असल्याचा स्पष्ट संदेश दिला. मातोश्रीवर झालेल्या या भेटीतून ठाकरे गटाने पराभवानंतरही आक्रमक आणि आत्मविश्वासपूर्ण भूमिका घेतल्याचं चित्र स्पष्ट झालं आहे.

# धोत्रा गावातील पात्र असुन हि लाडक्या बहिणी १५०० हप्त्या पासुन वंचित

दैनिक वादळ वार्ता
**अमरावती । प्रतिनिधी**

अमरावती जिल्ह्यातील बऱ्याच गावातील लाडक्या बहिणी राज्य शासनाच्या महत्वाकांक्षी मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण, योजनेचा लाभ हा सर्वांना मिळत असताना अचानक काही महिन्यापासुन सुरु असलेली इ केवायशी करणे बंधनकारक करण्यात आले होते या साठी ३१डिसेबर २०२५ हि मुदत देण्यात आली होती मात्र हि प्रक्रिया पुर्ण करताना तांत्रिक समज नसल्या मुळे आणखी चुकीच्या पर्यावर किल्क केल्यामुळे जिल्ह्यातील शेकडो महिला त्यात अती गरजु गरीब शेतमजूर या योजना पासुन वंचित असल्याची ओरड धोत्रा या गावातील महिला जोर धरत आहे. अमरावती जिल्ह्यातील ग्रामिण सह धोत्रा गावातील महिलांना एक संधी उपलब्ध करून देण्याची मागणी..होत आहे शासनाने डिसेंबर २०२५ मध्ये लाडक्या बहिणीच्या खात्यात हप्ता जमा केला त्यानंतर



१३ जानेवारी रोजी ही आणखी एक हप्ता जमा झाला. परंतु या मध्ये काही लाडक्या बहिणी ची संक्रांत गोड तर काहींची काहीच नसल्याने पात्र असतानाही चुकीचे पर्याय निवडल्याने हप्ता बंद झाल्याने शासनाने दुरूस्ती साठी एक संधी द्यावी अशी मागणी धोत्रा येथील लाडकी बहिण लाभार्थी रिता गोडाने.शशिकला कांबळे.पुष्पा गोंडाने सह ग्रामिण भागातील महिलान कडुन होत आहे..१५०० रुपये मिळत असल्याने बऱ्याच महिलांना मुलांच्या शिक्षणासाठी..दवाखाना तसेच अत्यंत महत्त्वाच्या कामासाठी महिलांना दिलासा मिळत होता..मात्र नेमक्या कोणत्या कारणाने योजनेचा हप्ता मिळाला नाही यांचा शोध घेण्या साठी महिला दररोज बॅक व शेतु केंद्रामध्ये महिला धावपळ करत आहे.

# 'स्वाराती'तील सुविधांचा खा.सोनवणे घेणार आढावा

## १९ जानेवारीला सर्व वैद्यकिय अधिकारी,कर्मचारी राहणार उपस्थित

दैनिक वादळ वार्ता
**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालय, अंबाजोगाई येथे रुग्णसेवा, आरोग्य सुविधा, मनुष्यबळ, औषध साठा, पायाभूत सुविधा तसेच प्रलंबित विविध प्रश्नांबाबत खा.बजरंग सोनवणे सविस्तर आढावा घेणार आहेत. सोमवार, दि. १९ जानेवारी २०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

बीड लोकसभा मतदारसंघाचे खा.बजरंग मनोहर सोनवणे यांच्या पुढाकारातून सदर बैठक आयोजित करण्यात येत असून, यासंदर्भात रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालय प्रशासनास पत्राद्वारे सूचनाही दिल्या आहेत. सदर बैठकीस संबंधित विभागप्रमुख, वैद्यकीय अधिकारी तसेच प्रशासनातील



जबाबदार अधिकारी उपस्थित राहणार आहेत. ग्रामीण भागातील रुग्णांना दर्जेदार व वेळेवर आरोग्यसेवा मिळावी, रुग्णालयातील सुविधा अधिक सक्षम व्हाव्यात तसेच दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या अडचणींवर ठोस निर्णय घेण्यात यावा, या उद्देशाने ही आढावा बैठक घेण्यात येणार असल्याचे पत्रात नमूद करण्यात आले आहे. या बैठकीत रुग्णसेवेशी संबंधित विविध मुद्द्यांवर चर्चा करून आवश्यक त्या उपाययोजना सुचविण्यात येणार असून, आरोग्य यंत्रणेमधील समन्वय अधिक बळकट करण्यावर भर दिला जाणार आहे. खा.बजरंग सोनवणे यांनी बीड जिल्ह्यात, आरोग्य, शिक्षण, दळवळण अशा विषयांना कायम महत्व दिलेले आहे. आरोग्य विभागातील अडचणी सोडविण्यासाठी ते तत्पर असतात. जिल्ह्यातील विविध आरोग्य केंद्रात देखील ते सरप्राईज व्हिजीट करत असतात. यामुळे आरोग्य यंत्रणा सतर्क असते. जिल्ह्यातील रूग्णांना दर्जेदार उपचार, सुविधा मिळाव्यात यावर खा.बजरंग सोनवणे यांचा भर आहे.

## वादळी कट्टा

निवडणूक आली, गल्लीत गोडी वाढली,
हातात झेंडे, तोंडात आश्वासनांची थाळी सजली,
मतदान झालं की नेतेच गायब झाले,
पाच वर्षे जनता मात्र काळजीत अडकली!

काल जे शत्रू, आज मित्र झाले,
सत्तेसाठी तत्त्वज्ञान बाजूला ठेवले,
घड्याळ, कमळ, मशाल बदलत राहिली,
पण जनतेची अवस्था मात्र तशीच राहिली!

दारोदारी नेते, पाया पडती साष्टांग,
तुमच्यासाठीच जगतो म्हणती मोठ्या थाटात रंग,
मतपेटीत मत गेलं की फोनही उचलेना,
विकासाचं स्वप्न मात्र पुढल्या वेळेला!

निवडणूक म्हणजे आश्वासनांचा मेळा,
भाषणात स्वर्ग, प्रत्यक्षात मात्र खेळा,
मतदार राजा हुशार हे विसरू नका,
फुकटच्या भूलथापांना आता बळी पडू नका!

संपादक
अजय भांगे



# नंदुरबार पोलिसांची मोठी कारवाई: शहाद्यातील आंतरराज्य मेंढी चोर टोळी गजाआड; १० लाखांच्या मुद्देमालासह ७ जण ताब्यात

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी.**

शहादा पोलीस ठाण्याच्या हद्दीत गेल्या काही दिवसांपासून मेंढपाळांची झोप उडवणाऱ्या आंतरराज्य टोळीचा नंदुरबार स्थानिक गुन्हे शाखा आणि शहादा पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. या धडक कारवाईत पोलिसांनी ७ आरोपींसह एका विधीसंघर्षग्रस्त बालकाला ताब्यात घेतले असून, त्यांच्याकडून १० लाख १० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईमुळे चोरीचे एकूण तीन गुन्हे उघडकीस आले आहेत.

३१ डिसेंबर २०२५ रोजी शहादा तालुक्यातील शेतांमधून मेंढ्या चोरीला गेल्याच्या तक्रारी झाल्या होत्या. पोलीस अधीक्षक श्रवण दत्त एस. यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेने तांत्रिक तपास सुरू केला. तपासादरम्यान, चोरीचा माल विकत घेणारा आरोपी मोहसिन ऊर्फ राजा हारुन खान (राहणार. राजपूर, जिल्हा बडवाणी, मध्य प्रदेश) याला पोलिसांनी ताब्यात घेतले. त्याच्या चौकशीतून राजस्थानमधील चिंटू बंजारा आणि त्याच्या टोळीचे नाव समोर आले.



ही टोळी अत्यंत नियोजनबद्ध रित्या चोरी करत असे. रात्रीच्या वेळी मेंढपाळांच्या वाड्यांमधून मेंढ्या चोरून त्या वाहनांच्या सहाय्याने मध्य प्रदेशात विक्रीसाठी नेल्या जात होत्या. पोलिसांनी सापळा रचून राजस्थानमधील बुंदी जिल्ह्यातील ५ आरोपी आणि मध्य प्रदेशातील एका आरोपीला अटक केली आहे. पोलिसांनी या कारवाईत गुन्ह्यात वापरलेली वाहने आणि इतर साहित्य जप्त केले आहे. यामध्ये :

एक इको कार (RJ20UB5627)
एक पांढऱ्या रंगाचा 'छोटा हत्ती' (DOST LS)
एक क्क्ष डिलक्स मोटारसायकल
मेंढ्या विक्रीतून मिळालेली रोख रक्कम आणि चोरीसाठी लागणारी साधने.

ही यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक श्रवण दत्त एस., अपर पोलीस अधीक्षक आशित कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील, शहादा पोलीस निरीक्षक हेमंतकुमार पाटील, पोलीस सब इन्स्पेक्टर विकास गुंजाळ, मुकेश पवार आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केली आहे.पुढील तपास शहादा पोलीस करत असून या टोळीकडून आणखी काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

# संपादकीय

## ये तो होना ही था...




भाजपने निवडणुकीची समीकरणं बदलून टाकली आहेत, हे अजून विरोधकांना उमगलेलंच नाही. नेत्याभोवती फिरणारे किंवा पक्ष कार्यालयातील खुर्च्या उबवणाऱ्या पदाधिकाऱ्यांच्या जीवावर यापुढे निवडणुकांचे व्यवस्थापन होऊ शकणार नाही. राज्यातल्या २९ महानगरपालिकांच्या निकालाने जो आश्चर्यचकित होईल, त्याला राजकारणातला ओ की ठो कळत नाही, असं खुशाल समजा. तसं लेखी प्रशस्तीपत्र देण्यासही तो पात्र आहे, हे ठरवून टाका. गेली दहा वर्षे भारतीय जनता पक्ष ज्या पद्धतीने निवडणुका जिंकतो आहे, ते स्पष्ट दिसत असूनही कोणी या निवडणुकीत विरोधकांच्या विजयाची आशा लावून बसला असेल, तर त्याला खात्रीने भोळसटच म्हटलं पाहिजे. २०१४ मध्ये विरोधक बेसावध होते. त्यानंतर ते सावध होत गेले; पण त्यांचं सावध होत जाणं आणि त्याच वेळेला त्यांचा शक्तिपात होत जाणं या दोन्ही गोष्टी एकाच वेळी घडल्याने गेल्या दहा वर्षांत विरोधकांना कुठेच डोकं वर काढता आलं नाही. विधानसभेच्या निवडणुकीवेळी महाराष्ट्रातील सर्व विरोधी पक्षांची एकत्र मोट बांधली गेली. पण त्या एकत्रित विरोधी पक्षाचाच 'सुपडा साफ' झाल्याने त्यानंतर ही मोट शिल्लक राहणार नाही, हे गृहीतच होतं. नगरपालिका निवडणुकीपूर्वी मोट बांधण्याचे दिखाऊ प्रयत्न केले गेले. पण, तेही इतके क्षीण, इच्छाशक्तीचा अभाव असलेले होते की त्याने काही होणार नाही, हे दिसत होतं. महानगरपालिका निवडणुकांवेळी तर सगळेच वाघ झाले होते. प्रत्येक जण दुसऱ्यावर गुरकावत होता. त्यांचा एकत्र संसार शक्य नव्हता. अशा विखुरलेल्यांचं जे व्हायचं, तेच झालं. ते सगळे कागदी वाघ असल्याचं मतदारांनी एकच बटन दाबून सिद्ध केलं. विरोधकांमध्ये जे महत्त्वाचे दोन पक्ष होते, काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) हे दोन्ही नेतृत्वहीन झाले आहेत. त्यांना ना रणनीती उरली आहे, ना उमेदवारांना बळ देण्याएवढी शक्ती. ठाकरे बंधू तर आपली मुंबईतली जहागिरी वाचवण्यातच जीवाचा आटापिटा करत राहिले. त्यामुळे, भारतीय जनता पक्षाला आता इथे विरोधकच शिल्लक नाही, असं चित्र महाराष्ट्रात निर्माण झालं. संपूर्ण महाराष्ट्रात भाजपला मतदारांनी जो कौल दिला, तो या अर्थाने अपेक्षितच होता.भारतीय जनता पक्षाच्या निवडणुकीच्या तयारीची, सूक्ष्म नियोजनाची, त्यासाठी आवश्यक असलेल्या कार्यकर्त्यांच्या जाळ्याची कल्पना अन्य पक्षांना नाही. निवडणुका जाहीर होण्याआधी महिना - दोन महिना जागे होणारे हे पक्ष आणि भाजपमध्ये खूप अंतर आहे. भाजपने निवडणुकीची समीकरणं बदलून टाकली आहेत, हे अजून विरोधकांना उमगलेलंच नाही. नेत्याभोवती फिरणारे किंवा पक्ष कार्यालयातील खुर्च्या उबवणाऱ्या पदाधिकाऱ्यांच्या जीवावर यापुढे निवडणुकांचे व्यवस्थापन होऊ शकणार नाही. पक्ष नेतृत्वाने दुसऱ्या फळीतील नेत्याला जिल्हा किंवा तालुका बहाल करायचा आणि मग त्या नेत्याने खाली त्याच पद्धतीने प्रभाग - गट - पंचायती बहाल करून टाकायच्या ही राजकारणाची 'काँग्रेसी' घडी केव्हाच कालबाह्य झाली आहे. 'ठाकरे' आणि 'पवार' या दोन ब्रँडसाठी कार्यकर्त्यांनी निष्ठेने आपली फळी धरून ठेवण्याचे दिवसही संपले आहेत. बिहारमध्ये जे लालूप्रसाद यादव यांच्या घराण्याचं झालं, तेच इथेही होईल, हे सांगायला कोणा ज्योतिषाची गरज नाही. लालूंच्यामागे त्यांची मुलं आपापली राजकीय समज घेऊन आपापल्या पद्धतीने मैदानात दिसतात तरी आहेत. इथे दोन्हीकडे पुढच्या पिढीत अंधार आहे. कार्यकर्त्यांच्या पातळीवर जाऊन काम करण्याची, पक्ष बांधण्याची क्षमता कोणातच नाही. मतदार अशांना फार काळ डोक्यावर घेऊन नाचत नाही. नगरपालिका, महानगरपालिका निवडणुकांनंतर जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत ही बाब अधिक स्पष्ट होईल. ' मुंबईचा ठाकरेंचा आणि पुण्याचा पवारांचा' असे माध्यमांनीच उभे केलेले 'गड' किती खोटे आणि पोकळ होते, हे यानिमित्ताने सिद्ध झालं, ते एक बरं झालं. महायुतीतल्या पवारांचा आकार त्यामुळे देशाला कळला. विमनस्क अवस्थेत त्यांनी भाजपवर आणि भाजपच्या नेत्यावर जे वार केले, ते त्यांच्याच अंगलट आले. बारामती मतदारसंघातल्या फुगवलेल्या प्रभावापलीकडे पुण्यात प्रत्यक्ष जमिनीवर यांना काही जागा नाही, हे भाजपच्या पुण्यातल्या नेत्यांनी दाखवून दिलं. 'खिशात नाही आणा अन् मला बाजीराव म्हणा' हे कोणाला लागू होतं, तेच मतदानाच्या आकड्यांनी स्पष्ट केलं. पुण्याच्या पालक मंत्रीपदाचा त्यांचा हट्ट पुढच्या वेळी किती मानला जाईल, कोणास ठाऊक!महाराष्ट्राने आता 'ट्रिपल इंजिन' स्वीकारलं आहे. 'पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्थानिक निवडणुकांत येण्याची गरजच नाही. आमचा तुमच्यावर विश्वास आहे', हेही मतदारांनी या निवडणुकीत सांगून टाकलं आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आधुनिक महानगरांबद्दल अनेक कल्पना आहेत. त्या प्रत्यक्षात आणणं आता सोपं जाईल.बकाल झालेल्या, अस्ताव्यस्त पसरलेल्या शहरांना आकार देता येईल. त्या त्या भागातल्या संस्कृतीला अनुसरून शहरांना चेहरा देता येईल. सर्व शहरं स्वच्छ, नेटकी करण्याला प्राधान्य देण्याची नितांत गरज आहे. अन्य राजकीय पक्षांना सोबत घेऊन ती शक्य तितकी 'फ्लेक्स'मुक्तही करायला हवीत. पुणे, नाशिक, छत्रपती संभाजी नगर, अहिल्यानगर या शहरांकडे नियोजनाच्या दृष्टीने आत्ताच लक्ष दिलं नाही, तर उद्या तिथली परिस्थिती भयावह होईल. या सर्वच शहरांकडे स्वतंत्रपणे लक्ष देण्याची गरज असून मुंबई प्रदेश विकास प्राधिकरणाच्या क्षेत्रातील महानगरपालिकांचा एकत्रित विचार होण्याची गरज आहे. मतदारांनी भरभरून प्रेम व्यक्त केलं आहे. त्याची उतराई करण्याचं आव्हान महायुतीला स्वीकारावं लागेल. संपूर्ण महाराष्ट्र एकहाती हाती येण्याचं महत्त्व भाजपच्या शीर्षस्थ नेत्यांना उत्तम ठाऊक आहे!

# कन्हेरवाडीचे भूमिपुत्र चि.आश्रुबा सुरेश नाना फड यांनी इंटरनॅशनल माथेमॅटिक्स ऑलिम्पिड (आयएमओ) परीक्षेत सुवर्ण कामगिरी; परळी वैजनाथ तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा

दैनिक वादळ वार्ता
**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

परळी वैजनाथ तालुक्यातील कन्हेरवाडीचे भुमीपुत्र तथा पोदार इंटरनॅशनल स्कूल, लातूर येथील इयत्ता पाचवीचा विद्यार्थी चि.आश्रुबा सुरेश (नाना) फड याने इंटरनॅशनल माथेमॅटिक्स ऑलिम्पिड (आयएमओ) परीक्षा २०२५-२६ मध्ये उल्लेखनीय कामगिरी करत सुवर्णपदक पटकावले आहे. त्यामुळे परळी वैजनाथ तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. ही परीक्षा आंतरराष्ट्रीय स्तरावर अत्यंत प्रतिष्ठेची व आव्हानात्मक मानली जाते. इंटरनॅशनल माथेमॅटिक्स ऑलिम्पिड (आयएमओ) २०२५-२६ या परीक्षेत ७२ देशांतील ९९, ४९९ शाळांमधील सुमारे ८ कोटी १ लाख विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. अशा मोठ्या स्पर्धेत परळी वैजनाथ तालुक्यातील कन्हेरवाडीचे भुमीपुत्र चि.आश्रुबा सुरेश (नाना) फड याने आपली गुणवत्ता सिद्ध करत आंतरराष्ट्रीय रँक २०३१, रिजनल रँक १३५३, झोनल रँक ८८३ तसेच स्कूल रँक ०६ प्राप्त केला आहे. सदर परीक्षा लातूर येथे पार पडली. जागतिक पातळीवर ग्रेड ५ मिळवत त्याने शाळेचा नावलौकिक वाढवला आहे.या यशाचे श्रेय चि.आश्रुबा सुरेश (नाना) फड यांनी रेश्मा काकडे मॅडम (लातूर), ढगेज कोचिंग क्लासेसचे विवेक ढगे सर व त्यांची संपूर्ण टीम, पोदार इंटरनॅशनल स्कूलचे प्रिन्सिपल रेड्डी सर, वर्गशिक्षक राहुल दिवे सर, शाळेतील सर्व शिक्षक व कर्मचारी तसेच आई-वडिलांच्या मोलाच्या मार्गदर्शनाला दिले आहे. परळी वैजनाथ तालुक्यातील कन्हेरवाडी गावचे भूमिपुत्र तथा उद्योजक सुरेश नाना फड यांचे चिरंजीव आश्रुबा फड याने अत्यंत खडतर असलेल्या या आंतरराष्ट्रीय परीक्षेत शाळेत ६ वा क्रमांक, झोनल ८८३ वा क्रमांक व आंतरराष्ट्रीय स्तरावर २०३१ वा क्रमांक मिळवून घवघवीत यश संपादन केले आहे. या यशामुळे त्याला शाळेच्या उत्कृष्टतेचे सुवर्णपदकही प्रदान करण्यात आले. या उल्लेखनीय यशाबद्दल चि. आश्रुबा सुरेश फड यांचे सर्व स्तरातून अभिनंदन व शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.



# आदिवासी शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळा,चिंबी पाडा येथे मकर संक्रांतीनिमित्त पतंगोत्सव व सांस्कृतिक उपक्रम संपन्न

दैनिक वादळ वार्ता
**भिवंडी । प्रतिनिधी**

चिंबीपाडा येथील आदिवासी शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळा, चिंबीपाडा येथे वर्षांतील पहिला सण मकर संक्रांतीचे निम्मिताने विद्यार्थ्यांच्या विकासासाठी विविध शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास शाळेचे मुख्याध्यापक संदीप कदम, अधीक्षिका माधुरी लोखंडे व अधीक्षक महादेव भंडारी हे उपस्थित होते.मकर संक्रांतीनिमित्त आयोजित उपक्रमांतर्गत शाळेतील विद्यार्थिनींनी स्वतःच्या कल्पकतेने रंगीबेरंगी पतंग तयार केले. या पतंगांवर विद्यार्थिनींनी जीवनमूल्ये, शिक्षणाचे महत्त्व, परिश्रम, स्वच्छता, एकता व सकारात्मक विचार यावर आधारित प्रेरणादायी सुविचार लिहिले. परिश्रमाशिवाय यश नाही, शिक्षण हेच उज्ज्वल दार, सकारात्मक विचार जीवन घडवतात अशा अनेक अर्थपूर्ण सुविचारांनी पतंग सजवण्यात आले.

या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थिनींमध्ये सर्जनशीलता विकसित करणे, हस्तकलेची आवड निर्माण करणे तसेच सुविचारांच्या माध्यमातून नैतिक मूल्यांचे संस्कार रुजवणे हा होता. विद्यार्थिनींनी अत्यंत उत्साहाने सहभाग घेतला. तयार केलेले पतंग शाळेच्या परिसरात व वर्गांमध्ये प्रदर्शित करण्यात आले. त्यामुळे संपूर्ण शाळेत संक्रांतीचा आनंदमय व उत्साह निर्माण झाला.कार्यक्रमावेळी उपस्थित मुख्याध्यापकांनी विद्यार्थिनींच्या कलागुणांचे कौतुक करत अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मिळते, असे मत व्यक्त केले. अधीक्षिका माधुरी लोखंडे व अधीक्षक महादेव भंडारी यांनी देखील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत सणांच्या माध्यमातून आपली परंपरा, संस्कृती व एकतेचे महत्त्व जपले पाहिजे, असे सांगितले. कार्यक्रमाच्या मकर संक्रांतीच्या परंपरेनुसार विद्यार्थ्यांना तिळगूळ, चिवडा, बटाटाभजी आणि मिक्स भजी व इतर पारंपरिक खाऊचे वाटप करण्यात आले. तिळगूळ घ्या, गोड गोड बोला या संदेशातून आपुलकी, प्रेम यांचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले. खाऊ वाटपामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून येत होता.या संपूर्ण उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेतील स्त्री अधिक्षिका माधुरी लोखंडे आणि अधीक्षक महादेव भंडारी यांनी विशेष परिश्रम घेतले. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढतो तसेच त्यांचा शैक्षणिक व सांस्कृतिक विकास होतो. मकर संक्रांतीनिमित्त आयोजित हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी, आनंदमय व संस्मरणीय ठरला. यामध्ये अधिक्षिका माधुरी लोखंडे आणि विध्यार्थीनीच्या मदतीने उपक्रम यशस्वी केला असून यापुढे असेच उपक्रम करत राहावे अशी अपेक्षा विध्यार्थीनींनी व्यक्त केली.





# मुंबईत महायुतीला बहुमत मिळाल्याबद्दल केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेवून केले अभिनंदन

## राज्यभरातील २९ महानगरपालिकांमध्ये महायुतीच अव्वल

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

अत्यंत प्रतिष्ठेची निवडणुक ठरलेल्या मुंबई महानगरपालिका निवडणुकीत भाजप शिवसेना रिपाइं महायुतीला स्पष्ट बहुमत मिळाल्याबद्दल रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची आज वर्षा बंगल्यावर भेट घेवून हार्दिक अभिनंदन केले. राज्यातील २९ महापालिकांपैकी २६ महापालीकांमध्ये महायुतीला बहुमत मिळाल्याबद्दल ना.रामदास आठवले यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन केले आहे. महाराष्ट्रात सर्व महापालिकांमध्ये महायुतीच्या महाविजयाचे शिल्पकार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ठरल्याचे सांगत ना. रामदास आठवले यांनी मुख्यमंत्र्यांचे अभिनंदन केले आहे.मुंबई महापालिकेची निवडणुक ठाकरे बंधूंनी प्रतिष्ठेची निवडणुक केली होती. गेली २५ वर्ष उध्दव ठाकरे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेचे मुंबई महापालीकेवर राज्य होते. मराठी भाषेचा भावनिक मुद्दा उपस्थित करुन उध्दव आणि राज या दोन बंधुनी मुंबई पालिकेची निवडणुक चुरशीची केली होती. या निवडणुकीच्या निकालाबाबत आपण आधीच सांगितले होते की, मुंबईत मराठी जनता ही भावनिक राजकारणाला भुलणार नाही. विकासाच्या मुद्दयांना मराठी जनता महत्व देईल. मराठी भाषिक जनतेने आणि मुंबईतील गैरमराठी जनतेने महायुतीला भरभरुन मतदान केले आहे. त्यामुळे महायुतीचा महाविजय झालेला आहे. उध्दव ठाकरे यांच्या नेतृत्वातील शिवसेना अनेक वर्ष मुंबई महापालिकेवर राज्य करु शकली ते केवळ भाजपच्या पाठिंब्यामुळे! २०१२ सालापासुन रिपब्लिकन पक्षाने शिवसेनेला शिवशक्ती -भिमशक्तीच्या माध्यमातुन पाठिंबा दिला होता. मात्र आता भाजप रिपाइं ठाकरे सेने सोबत नसल्यामुळे शिवसेनेचा दारुण पराभव झालेला आहे. राज ठाकरे यांच्या युतीमुळे उध्दव ठाकरेंचा फायदा होणार नाही; हे मी या आधीच सांगितले होते असे ना. रामदास आठवले म्हणाले.राज्यातील २९ महापालिकांपैकी २६ महापालिकेत महायुतीचा महाविजय होणार असल्याचा आपला अंदाज खरा ठरला असल्याचे ना.रामदास आठवले म्हणाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कुशल नेतृत्वामुळे राज्यभरातील २९ महापालिकांमध्ये महायुतीने चांगली कामगिरी केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात मुंबईत महायुतीचा महाविजय झाला असल्याचे ना. रामदास आठवले म्हणाले. महायुतीला महाविजय दिल्याबद्दल मुंबईकरांचे आणि राज्यातील जनतेचे ना. रामदास आठवले यांनी आभार मानले आहे. आंबेडकरी जनतेने आपला कौल महायुतीला दिल्याबद्दल ना.रामदास आठवले यांनी आंबेडकरी जनतेचेही आभार मानले आहेत.



# वहाळच्या साई मंदिरात चंद्रकांत शिंदे यांनी रसिकांना जिंकले

दैनिक वादळ वार्ता
**उलवे । प्रतिनिधी**

महिन्याच्या दुसऱ्या गुरुवारी वहाळच्या साई मंदिरात आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत अन्नदान करतात. त्यानुसार गुरुवारी (ता.१५) त्यांनी अन्नदान केले. यावेळी मनोज तुलशीदास ठाकूर आणि प्रियांका मनोज ठाकूर यांच्या हस्ते साईबाबांचे मंगलस्नान करण्यात आले. यावेळी 'स्वर प्रल्हादाचे' हा प्रल्हाद शिंदे यांच्या गीतांवर आधारित सुमधुर गाण्यांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. प्रल्हाद शिंदे यांचे चिरंजीव चंद्रकांत शिंदे यांनी प्रल्हाद शिंदे यांची गाजलेली गाणी सादर करून रसिकांना जिंकले. महेंद्रशेठ घरत यांनी या कार्यक्रमाचे प्रायोजकत्व स्वीकारले होते. 'ऐका सत्य नारायणाची कथा, गेला हरी कुण्या गावा, चंद्रभागेच्या तीरी, पंढरपुरात काय वाजतगाजत, मंगळवेढे भूमी संतांची, उड जायेगा पंछी, चढता सुरज, झूम बराबर झूम या' या एकापेक्षा एक गीतांनी आणि कव्वालीने चंद्रकांत शिंदे यांनी रसिकांना मंत्रमुग्ध केले आणि प्रल्हाद शिंदे यांच्या आठवणी जाग्या केल्या. त्यामुळे रसिक भारावले होते. या कार्यक्रमाची आखणी श्रीकांत मुंबईकर यांनी केली होती. यावेळी महेंद्रशेठ घरत म्हणाले, आम्ही लहानपणी प्रल्हाद शिंदे, गोविंद म्हशीलकर, रंजना शिंदे आदींचे कव्वालीचे सामने ऐकायला रात्रीच्या वेळी पंचक्रोशीतील गावांत जायचो. जमिनीवर जागा मिळेल तिथे बसायचो. त्यावेळी त्यांची गाणी खूप आवडायची. त्यांचा मी चाहता आहे; परंतु त्यावेळी फार कमी पैसे बक्षीस म्हणून दिले जायचे. कारण चार आणे, आठ आण्याचा तो काळ होता; परंतु परमेश्वराने मला आता भरभरून दिले आहे. त्यामुळे मी आज चंद्रकांत शिंदेच्या दमदार आवाजाने पुन्हा त्या काळात गेलो आहे. प्रल्हाद शिंदेंचा तोच आवाज, तीच लकब, तशीच शेरोशायरी ऐकून मला निश्चितच खूप आनंद मिळाला आहे, असे म्हणत ते प्रल्हाद शिंदे यांच्या आठवणींत रमले होते. यावेळी महेंद्रशेठ घरत यांच्या हस्ते चंद्रकांत शिंदे यांचा सन्मान करण्यात आला. तसेच आर्मी दिनानिमित्त रक्तदान केलेले माजी सैनिक नीलेश म्हात्रे यांचा सपत्नीक सन्मान गायन सम्राट चंद्रकांत शिंदे यांच्या हस्ते करण्यात आला. महेंद्रशेठ घरत यांनीही रक्तदान केले. त्याबद्दल त्यांचेही कौतुक करण्यात आले.यावेळी साई मंदिर वहाळचे अध्यक्ष रविशेठ पाटील, श्रीकांत घरत, रमेशशेठ घरत आणि एम. जी. ग्रुप, हजारो साईभक्त उपस्थित होते.



# मुंबईकरांनी विकासाला स्वीकारले, भावनिकतेला नाकारले-उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचा ठाकरेंना टोला

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई (वृत्तसंस्था)**

राज्यातील महापालिका निवडणुकांमध्ये शिवसेना-भाजप महायुती बहुमताच्या उंबरठ्यावर पोहोचली असून, राज्यभरातील अनेक महापालिकांमध्ये महायुतीचे महापौर होतील, असा ठाम विश्वास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केला.ठाणे, कल्याण-डोंबिवली, संपूर्ण एमएमआर आणि मुंबईत महायुतीने जोरदार मुसंडी मारली असल्याचे त्यांनी सांगितले. ठाण्यात शिवसेनेला स्पष्ट बहुमत मिळाले असून, एमएमआर परिसरातही चांगल्या जागा मिळाल्या आहेत. मुंबईतही शिवसेना-भाजप महायुतीचा महापौर होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. बहुमताच्या अगदी जवळ पोहोचलो असून, राज्यात अनेक ठिकाणी महायुती सत्ता स्थापन करेल, असेही त्यांनी स्पष्ट केले.उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, निवडणुकीदरम्यान काही ठिकाणी भावनिक मुद्दे, भ्रष्टाचाराचे आरोप आणि विविध प्रकारचा प्रचार करण्यात आला. मात्र, मुंबईकरांनी आणि राज्यातील मतदारांनी भावनिकतेपेक्षा विकासालाच कौल दिला आहे. विकासविरोधी भूमिका घेणाऱ्यांना जनतेने नाकारले असून, विकास हाच ब्रँड जनतेने स्वीकारला असल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले. उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाने (उबाठा) १५० हून अधिक जागा लढवून सुमारे ६० जागा जिंकल्या, मात्र एकंदरीत जनतेने विकासाच्या अजेंडालाच पाठिंबा दिल्याचे त्यांनी नमूद केले.केंद्रात आदरणीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार, राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकार आणि मुंबई महापालिकेत महायुतीची सत्ता अशा ट्रिपल इंजिन सरकारचा मुंबईला मोठा फायदा होणार असल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट केले. भारत ५ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेच्या दिशेने वाटचाल करत असताना, त्या प्रवासात मुंबईचा मोठा वाटा असावा, यासाठी विशेष नियोजन करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. मुंबईला जागतिक दर्जाचे, जगाला हेवा वाटेल असे आंतरराष्ट्रीय शहर बनवण्याचा आमचा प्रयत्न असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.गेल्या साडेतीन वर्षांत मुंबईसाठी करण्यात आलेल्या आणि सुरू असलेल्या विकासकामांचा आढावा देताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले की, पुढील वर्षी मे महिन्यापर्यंत मुंबईतील सर्व प्रमुख रस्ते काँक्रीटचे करण्यात येणार असून, शहर खड्डेमुक्त



झाल्याचे नागरिकांना प्रत्यक्ष अनुभवायला मिळेल. मुंबईत सात ठिकाणी सिव्हरेज ट्रीटमेंट प्लांट (एसटीपी) उभारले जात असून, यामुळे प्रदूषणमुक्त मुंबईकडे मोठे पाऊल टाकले जाईल. मेट्रो २, मेट्रो ३ आणि इतर मार्गांचे जाळे पूर्ण करण्यासाठी काम वेगात सुरू असून, पूर्वी रखडलेले प्रकल्प पुन्हा मार्गी लावण्यात आले आहेत.बीकेसी आणि कुर्ला परिसरात नवीन 'अँड-फ्रेंड' ट्रान्सपोर्ट सिस्टीम उभारली जात असल्याचे त्यांनी सांगितले. मुंबईत नवीन वाहतूक पर्याय म्हणून पॉड टॅक्सीचा प्रयोग सुरू करण्यात आला असून, ठाणे-साकेत-गायमुख-फॉन्ट्रान मार्गामुळे ईस्टर्न एक्सप्रेस हायवेवरील वाहतूक कोंडी कमी होणार आहे. गोरेगाव-मुलुंड लिंक रोड, बोरिवली टनेल आणि रिंग रोड प्रकल्पांमुळे शहरातील वाहतूक अधिक सुलभ होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.आरोग्य, स्वच्छता आणि पुनर्विकासाबाबत बोलताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना आणि रुग्णालयांच्या सुविधा अपग्रेड केल्या जात असून, आरोग्य सेवांवर विशेष भर दिला जात आहे. धोकादायक इमारतींच्या पुनर्विकास प्रकल्पांना गती देण्यात आली असून, झोपडपट्टीमुक्त मुंबईचा संकल्प पुन्हा नव्याने राबवण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

आम्हाला केवळ महापौरपद किंवा सत्तेची खुर्ची महत्त्वाची नाही, तर मुंबईकरांच्या जीवनात बदल घडवायचा आहे. मुंबईबाहेर गेलेला मुंबईकर पुन्हा मुंबईत परतावा, ही आमची भूमिका आहे, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट केले. मुंबईकरांनी आणि राज्यातील जनतेने दिलेला कौल आम्ही पूर्णपणे मान्य करतो. जिथे युती आहे, तिथे सत्ता स्थापन करणार आणि जिथे वेगळी समीकरणे आहेत, तिथे परिस्थितीनुसार निर्णय घेणार, असेही त्यांनी सांगितले.या निकालामध्ये लाडक्या बहिणींचा मोठा सहभाग असल्याचे त्यांनी नमूद करत त्यांच्या योगदानाबद्दल विशेष आभार मानले. शिवसेना आणि भाजपची विचारधारा एकच असून, त्यात कोणतीही तडजोड केली जाणार नाही. आमचा अजेंडा साधा आणि स्पष्ट आहे. विकास, विकास आणि विकास, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.पत्रकार परिषदेत शेवटी त्यांनी ठामपणे सांगितले की, मुंबईला ट्रॅफिकमुक्त, प्रदूषणमुक्त, भ्रष्टाचारमुक्त आणि जागतिक दर्जाचे शहर बनवण्यासाठी सरकार कटिबद्ध आहे. राज्यभरात महायुती बहुमताच्या जवळ पोहोचली असून, अनेक महापालिकांमध्ये महायुतीचे महापौर होतील. जनतेने विकासाचा कौल दिला आहे आणि त्याच विश्वासावर सरकार पुढील काळात मुंबई आणि महाराष्ट्राचा वेगाने विकास करेल असे सांगितले.यावेळी खासदार नरेश म्हस्के, माजी आमदार रवींद्र फाटक, शिवसेना प्रवक्ते प्रकाश महाजन, युवासेना कार्याध्यक्ष पूर्वेश सरनाईक, ठाणे जिल्हा महिला संघटिका सौ. मीनाक्षी शिंदे आणि शिवसेनेचे सर्व निवडून आलेले नगरसेवक आणि पदाधिकारी उपस्थित होते.

# राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीकडुन निवडणूक लढविण्यासाठी ईच्छुकांची तुफान गर्दी

दैनिक वादळ वार्ता
**उदगीर । प्रतिनिधी**

जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२६ च्या अनुषंगाने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या ईच्छुक उमेदवारांची मुलाखत माजी मंत्री आ.संजय बनसोडे यांच्या प्रमुख उपस्थितीत घेण्यात आली. यावेळी ईच्छुक उमेदवारांची तुफान गर्दी होती.



यावेळी जिल्हा परिषद गट वाढवणा बु., तोगरी, सोमनाथपुर, लोहारा, निडेबन, नळगीर, हेर या गटातुन अनेकांनी मागणी केली आहे, तर पंचायत समिती गण वाढवणा बु., हंडरगुळी, तोगरी, दावणगाव, सोमनाथपुर, गुडसुर, लोहारा, कुमठा, निडेबन, शिरोळ, नळगीर, नागलगाव, हेर, देवर्जन गणातुन शेकडो कार्यकर्त्यांनी निवडणूक लढविण्यासाठी इच्छा व्यक्त केली आहे.

यावेळी प्रा.शाम डावळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष बालाजी भोसले, कार्याध्यक्ष वसंत पाटील, शिवाजी माने, नरसिंग कंदले, आदी उपस्थित होते.यावेळी उपस्थित कार्यकर्ते व निवडणूक लढविणाऱ्या इच्छुक उमेदवारांना आ. संजय बनसोडे यांनी संबोधित करताना म्हणाले की, ही निवडणूक सर्वसामान्य घटकाला व ग्रामीण भागातील प्रत्येक नागरिकाला सोयीसुविधा पुरविण्या साठी असून आपला येणारा लोकप्रतिनिधी हा जनतेचा सेवक म्हणून काम करणारा व जनतेच्या मनातला असावा अशी अपेक्षा व्यक्त करुन प्रत्येक जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गणातून जनतेच्या मागणीनुसार उमेदवारी देऊन एक सक्षम प्रतिनिधी निवडून आणणार असल्याचे ग्वाही आ. संजय बनसोडे यांनी उपस्थितांना दिली.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्री विकास वाचनालयाचा ५५ वा वर्धापनदिन उत्साहात साजरा

दैनिक वादळ वार्ता
**_औसा । प्रतिनिधी**

_औसा येथील विकास वाचनालयाचा दि १४ जानेवारी २०२६ बुधवार रोजी ५५ वा वर्धापनदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला असून ग्रंथालयात नवनवीन पुस्तकांचे प्रदर्शन भरवण्यात आले होते. या प्रदर्शनाचे उद्घाटन महाराष्ट्र शासनाने व महाराष्ट्र शासनाने औसा तालुक्यातील व्यक्तीला डॉ एस आर रंगनाथन, उत्कृष्ट कार्यकर्ता व उत्कृष्ट सेवक ग्रंथमित्र पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. धनंजय पवार (हसाळा) राज्यस्तरीय कार्यकर्ता ग्रंथमित्र पुरस्कार व सूर्यकांत जाधव ग्रंथपाल अलमला यांना विभाग स्तरीय ग्रंथमित्र सेवक पुरस्कार या दोघांचा सत्कार विकास वाचनालयाचे वतीने करण्यात आला. प्रथम ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. एस आर रंगनाथन यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. त्यानंतर प्रमुख पाहुण्यांचे सत्कार करण्यात आले. या ग्रंथालयात ग्रंथपाल म्हणून काम केलेले शिवाजी विद्यालयाचे मुख्याध्यापक अभिमन्यू जंगले यांचा व कार्यक्रमाचे प्रमुख प्रा. युवराज हलकुडे तसेच विकास वाचनालयाचे अध्यक्ष धनंजय कोपरे यांचा वाचनालयाच्या वतीने नवीन वर्षाची डायरी देऊन सत्कार करण्यात आला. गेली ५४ वर्ष या वाचनालयाने शहरातील अनेक प्रशासकीय अधिकारी घडविले, त्यात तहसीलदार, वकील, प्राध्यापक, इंजिनिअर अशा व्यक्तींना घडवण्यात खूप मोठा वाटा आहे. या ग्रंथालयात १८ दैनिके, १५० मासिके, ३५११७ ग्रंथ संख्या आहे. या सर्वांचा लाभ शहरातील वाचक घेतात. या वाचनालयाचे सभासद संख्या ५३० आहे. श्री विकास वाचनालयाची सुरुवात दि. १४ जानेवारी १९७१ रोजी शहरातील निवडक मित्रांनी एकत्र येऊन केली. कै. ड. त्रिंबकदास झंवर (काका), कै. न्याहळकर, जगदीश चव्हाण, जयराज उटगे, धनंजय कोपरे, विजयकुमार वैजवाडे, बसवराज मुर्गे या सात लोकांनी या वाचनालयाची सुरुवात केली. या वाचनालयाचे पहिले ग्रंथपाल राजाभाऊ पाठक त्यानंतर मारुती चिरके यांनी आपले पूर्ण आयुष्य या ग्रंथालयासाठी आयुष्य दिले. त्यांनी लातूर, उस्मानाबाद, नांदेड या भागात अनेक ग्रंथालये उभी केली. त्यामुळे आज हजारो कर्मचारी त्याच्यावर जगत आहेत. औसा तालुक्यातील सर्व ग्रंथालयांना मदत व चांगला वाचक घडण्याचे काम या ग्रंथालयाने केले आहे. हे ग्रंथालय गेले कित्येक वर्ष शहरात घरोघरी जाऊन सायकलवर पुस्तके देण्याची कामे केली आहेत. त्यामुळे वाचन चळवळ जिवंत ठेवण्यात काम केले आहे, असे प्रा. युवराज हालकुडे यांनी आपल्या भाषणात व्यक्त केले आहे, व हे ग्रंथालय येत्या एक ते दोन वर्षात स्वतःच्या इमारतीत जाईल असे आश्वासन ग्रंथालयाचे अध्यक्ष धनंजय कोपरे यांनी व्यक्त केले. यावेळी या कार्यक्रमासाठी वाचनालयाच्या सचिव रविराज कोपरे, उपाध्यक्ष निलेश उटगे, वैभव कुर्ले, धनंजय वैजवाडे, देविदास शेटकार, प्रा. पी सी भांगरे, वसंत भोंडे व वाचक वर्ग व वाचनालयाचे ग्रंथपाल विकास चिरके, सहाय्यक ग्रंथपाल गिरीधर जंगाले, सेवक धनंजय कठारे हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गिरीधर जंगाले यांनी केले, तर आभार विकास चिरके यांनी मानले.

# चिमुकल्यांच्या कष्टाची गोड कमाई! लोणी येथील शाळेत रंगला बाल आनंद मेळावा



दैनिक वादळ वार्ता
**आर्णी । प्रतिनिधी**

तालुक्यातील लोणी येथील पीएमश्री जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत नुकताच बाल आनंद मेळावा आणि महिला हळदी-कुंकू समारंभ उत्साहात पार पडला. अभ्यासाच्या ओझ्या पलीकडे जाऊन विद्यार्थ्यांनी आज प्रत्यक्ष बाजाराचा आणि व्यापाराचा अनुभव घेतला.

पुस्तकी ज्ञानासोबतच व्यवहार ज्ञान मिळावे, या उद्देशाने आर्णी तालुक्यातील लोणी येथील पीएमश्री जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत बाल आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यात तयार केलेले खाद्यपदार्थ, विविध वस्तूंचे स्टॉल्स लावले होते.विद्यार्थ्यांना मिळाला खऱ्या कमाईचा आनंद:

दिवसभर चाललेल्या या मेळाव्यात विद्यार्थ्यांनी केवळ वस्तू विकल्या नाहीत, तर ग्राहक हाताळणे, हिशोब ठेवणे आणि खऱ्या कमाईचा आनंद कसा असतो, याचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. चिमुकल्यांच्या या उत्साहाला पालकांनी आणि ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून दाद दिली. महिलांची विक्रमी उपस्थिती

या मेळाव्याचे खास आकर्षण ठरला तो म्हणजे 'महिला पालक हळदी-कुंकू कार्यक्रम. संक्रांतीचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या या सोहळ्याला गावातील महिलांनी मोठी गर्दी केली होती. शाळेने राबवलेल्या या उपक्रमामुळे शाळा आणि पालक यांच्यातील नात्याची वीण अधिक घट्ट झाल्याचे पाहायला मिळाले.

मुलांच्या अंगी असलेल्या कलागुणांना वाव मिळावा आणि त्यांना व्यवहाराची ओळख व्हावी, यासाठी हा मेळावा आयोजित केला होता. विद्यार्थ्यांचा उत्साह बघून अतिशय समाधान वाटत आहे. असे मत पालकांनी व्यक्त केले.

# गटसाधन केंद्र कंधार येथे हिंद-दी-चादरशहीदी समागम निमित्य तालुका स्तरीय स्पर्धेचे आयोजन

दैनिक वादळ वार्ता
**कंधार प्रतिनिधी**

श्री गुरु तेग बहादूर साहिब जी ३५० वा शहीदी समागम निमित्य कंधार गटसाधन केंद्र येथे तालुकास्तरीय वृक्तत्वस्पर्धा,निंबध स्पर्धा,चित्रकला स्पर्धा,गायन स्पर्धा दि.१६ जानेवारी संपन्न झाल्या असून कंधार तालुक्यातील विद्यार्थ्यांनी भरभरून प्रतिसाद दिला.

गटशिक्षणाधिकारी वसंत मेटकर यांच्या हस्ते दिनांक १६ जानेवारी रोजी सकाळच्या सत्रात तालुकास्तरीय स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. कंधार तालुक्यातील शालेय विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदविला.यावेळी शिक्षण विस्तार अधिकारी प्रविण पाटील, केंद्रप्रमुख विश्वाभर मटके, केंद्रप्रमुख बालाजी निवळे,ओमप्रकाश येरमे,सिध्देश्वर मलगीरवार, शिवाजीराव डिकळे,राजेश बिरादार, बालाजी वडजे, भास्कर पाटील कळकेकर,हरीभाऊ चिवडे,राजहंस शहापुरे,दिगांबर वाघमारे,महमंद अनसारोदीन,मारोती चिलपिंपरे, सुभाष मुंडे,महमंद जमील,शिवकुमार बच्चूवार,मिर्झा जमीर बेग आदीसह सहभागी स्पर्धेक,शिक्षक उपस्थित होते.




वकृत्व स्पर्धेत: प्रथम क्रमांक कु. सानिया शेख (माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळा नेहरूनगर ) तर जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पांगरा येथील फायजा शेख या विद्यार्थिनी द्वितीय क्रमांक पटकाविला. तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हासुळ येथील नुजत अस्लाम शेख हिने तृतीय क्रमांक पटकाविला. या विजेत्या स्पर्धकांना दिनांक २० जानेवारी रोजी गुरुग्रंथ साहेब जी भवन सचखंड शाळेच्या जवळ हिंगोली गेट नांदेड येथे होण्या जिल्हास्तरीय स्पर्धेला ते पात्र ठरले आहेत. तसेच

निबंध स्पर्धेत: नेहरूनगर आश्रम शाळेतील विद्यार्थी प्रताप जाधव यांनी प्रथम क्रमांक पटकावला तर जिल्हा परिषद हासूळ ची कु. ऋतुजा यादव यांनी द्वितीय क्रमांक पटकाविला आहे.

गायन स्पर्धेत : नेहरूनगर आश्रम शाळेची कु. अंजली पवार हिने प्रथम क्रमांक तर महात्मा फुले प्राथमिक शाळा कंधार ची कु. साईली वसंत आडे हिने द्वितीय क्रमांक पटकावला.चित्रकले स्पर्धेत :प्रथम क्रमांक पीएम श्री जि प हायस्कूल पेठवडज येथिल माशिका माधव कांबळे हिने प्रथम क्रमांक पटकावला तर जिल्हा परिषद प्राथमिक शाळा धानोरा कवठा येथील नेहा केशव जाधव हिने द्वितीय क्रमांक पटकावला आहे आणि जिल्हा परिषद मोहिजा येथील सीमा आयूब पठाण हिने तृतीय क्रमांक पटकाविला आहे.या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे सर्वच स्तरातून कौतुक होत आहे.

# पुढचा जल्लोष महापौर बसवल्यावर-देवेंद्र फडणवीस

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई (वृत्तसंस्था)**

राज्यातील २९ महापालिका निवडणुकांचे निकाल समोर येत आहेत. अनेक ठिकाणी भाजप आणि शिवसेना युती आघाडीवर आहे, तर काही ठिकाणी काँग्रेस आघाडीवर असल्याचे दिसून येत आहे. मुंबईत ठाकरे बंधूंच्या जोरावर शिवसेना ठाकरे गट आणि मनसेची देखील चांगली कामगिरी दिसून येत असली तरी भाजप आणि महायुती आघाडीवर असल्याचे दिसून येत आहे. त्याच निमित्ताने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईतील भाजपच्या कार्यालयात जाऊन निवडून आलेल्या कार्यकर्त्यांचे अभिनंद केले. यावेळी एकच जल्लोष पाहायला मिळाला.

सुरुवातील बोलताना भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण म्हणाले, आज खरेतर आम्हा सर्व भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांसाठी अत्यंत आनंदाचा दिवस आहे. प्रत्येक कार्यकर्त्याने जे स्वप्न पाहिले होते की येणाऱ्या प्रत्येक निवडणुकीत यशाच्या दिशेने पक्ष नेण्याच्या दृष्टिकोनातून गेली अनेक वर्ष हा बूथ लेव्हलवर ताकदीने प्रयत्न करत असताना दिसून येतो. असे अनेक कार्यकर्ते आहेत त्यांना निवडणुकीत संधी मिळाली नाही, त्याग आणि समर्पणाची भूमिका त्यांनी पार पाडली. देशाचे पंतप्रधान मोदीजी, अमित भाई असतील आणि सर्व नेतेगण आणि आमचे सर्वांचे नेते आदरणीय देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्राला एक दिशा देण्याचे काम केले आहे. संपूर्ण निवडणूक ही विकासाच्या दिशेने नेण्याचे काम केले, असे मत चव्हाण यांनी यावेळी व्यक्त केले.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, महानगरपालिकेच्या निवडणुकीत भाजप आणि महायुतीची सत्ता येत आहे. सर्वांचे लक्ष



लागलेल्या मुंबईच्या महापालिकेतही जी काही वाटचाल सुरू आहे, त्यानुसार पूर्ण बहुमत महायुतीलाच मिळणार आहे. जसे आता अध्यक्षांनी सांगितले की आपण या निवडणुकीत विकासाचा अजेंडा घेऊन गेलो. याच विकासाच्या अजेंडाला जनतेने भरभरून प्रतिसाद दिला आहे. लोकांना विकास हवा आहे म्हणून त्यांनी आपल्याला निवडून दिले आहे. तसेच या निकालाने आणखी एक गोष्ट स्पष्ट केली आहे, जनतेचा विश्वास हा देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर आहे. तसेच बाळासाहेब ठाकरे यांचेही मी स्मरण करतो, कारण त्यांचा आशीर्वाद हा आपल्याच पाठीशी होता, असेही फडणवीस म्हणाले.पुढे बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, आमचा अजेंडा हा विकासच असणार आहे. प्रत्येक माणसाच्या जीवनात परिवर्तन आणण्यासाठी आम्ही प्रयत्न करणार आहोत. हे सगळे करत असताना ही गोष्ट सांगितली पाहिजे, आमचा जो कार्याचा आत्मा आहे, जो विचारांचा आत्मा आहे, हा हिंदुत्ववादीच आहे. हिंदुत्व आणि विकास यांना वेगळे करता येणार नाही. आमचा हा जो आत्मा आहे, यानेच आम्हाला जनतेपर्यंत पोहोचवले. जो जो या देशाच्या संस्कृतीला आपली संस्कृती मानतो, अशा सगळ्या लोकांना आम्ही हिंदू मानतो.

मी एवढेच सांगू इच्छितो की, एवढे मोठे समर्थन जेव्हा मिळते, तेव्हा जबाबदारीची जाणीव ठेवली पाहिजे. आपल्याला जबाबदारीचे भान ठेवले पाहिजे. उन्माद नसावा. त्याचसोबत निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींना हेच सांगायचे आहे की आपण सर्वांनी या गोष्टीची जाण आपण ठेवली पाहिजे. लोकांनी दाखवलेल्या विश्वासाला तडा जाऊ देऊ नका, असा सल्ला देवेंद्र फडणवीस यांनी निवडून आलेल्या कार्यकर्त्यांना दिला.

# टोपी-रुमालाची प्रथा बंद करा; स्मशानभूमीच्या जागेसाठी समाज बांधवांनी संघटित व्हा!

## खानदेश दशनाम गोसावी समाजाचे अध्यक्ष साहेबराव गोसावी यांचे सवाई मुक्ती येथे परखड आवाहन

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**

समाजातील अनिष्ट रूढी-परंपरांना फाटा देऊन काळानुसार बदलणे गरजेचे आहे. माझ्या आईच्या निधनाप्रसंगी मी स्वतः टोपी-रुमालाचा आहेर बंद करण्याचा निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी केली. समाज बांधवांनी देखील ही विनाकारण खर्चाची प्रथा आता तात्काळ थांबवावी, असे परखड प्रतिपादन खान्देश दशनाम गोसावी समाजाचे अध्यक्ष साहेबराव गोसावी यांनी केले. सवाई मुक्ती येथे आयोजित एका उत्तरकार्याच्या कार्यक्रमात समाज बांधवांना संबोधित करताना ते बोलत होते. यावेळी त्यांनी समाजापुढील ज्वलंत प्रश्न आणि अनावश्यक प्रथांवर भाष्य करून उपस्थितांचे डोळे उघडले. आपल्या भाषणात साहेबराव गोसावी म्हणाले की, उत्तरकार्यासारख्या प्रसंगी नातेवाईकांकडून येणारा टोपी-रुमालाचा आहेर ही एक जुनी प्रथा आहे. मात्र, यात होणारा खर्च आणि अनावश्यकता पाहता, ही प्रथा आता बंद व्हायला हवी. मी स्वतःपासून याची सुरुवात केली असून, समाजातील इतर घटकांनीही या निर्णयाचे स्वागत करून ही प्रथा मोडीत काढावी. खानदेशातील दौऱ्याचा अनुभव सांगताना त्यांनी स्मशानभूमीच्या गंभीर प्रश्नाकडे लक्ष वेधले. ते म्हणाले, आज खान्देशात फिरताना मला एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते, ती म्हणजे मृत्यूनंतर अंत्यविधीसाठी लागणारी स्मशानभूमीची जागा आता अपूर्ण पडू लागली आहे. ही भविष्यातील मोठी अडचण ठरणार आहे. यावर उपाय म्हणून त्यांनी समाज बांधवांना कृती आराखडा सुचवला:तो म्हणजे खेडोपाडी राहणाऱ्या समाज बांधवांनी एकत्र येऊन स्मशानभूमीसाठी जागेची मागणी करणारा ठराव ग्रामपंचायतीकडून मंजूर करून घ्यावा. ज्या गावांतून असे ठराव प्राप्त होतील, त्या ठरावांवर मी स्वतः संबंधित आमदार आणि मंत्र्यांशी चर्चा करून शासन स्तरावर पाठपुरावा करेन. जेणेकरून भविष्यात प्रत्येक गावाला हक्काची जागा उपलब्ध होईल. केवळ स्मशानभूमी किंवा आहेरच नव्हे, तर समाजात आजही सुरू असलेल्या अनेक अनिष्ट रूढी-परंपरा थांबवण्याचे आवाहन साहेबराव गोसावी यांनी यावेळी केले. या कार्यक्रमाला खान्देशातील दशनाम गोसावी समाजातील पदाधिकारी तसेच बहुसंख्य समाज बांधव आणि प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# लोह्याचा बदला नांदेडच्या सिडकोत-एकनाथ दादा पवार



दैनिक वादळ वार्ता
**लोहा । प्रतिनिधी**

नांदेड-वाघाळा महानगरपालिकेच्या निवडणुकीत भाजपाला मिळालेल्या घवघवीत यशाबद्दल व सिडको प्रभागाचे यशस्वी नेतृत्व केल्याबद्दल भाजपाचे माजी प्रदेश प्रवक्ते एकनाथ दादा पवार यांचा लोहा येथील भाजपा कार्यालयात सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना पवार यांनी डिसेंबरमध्ये झालेल्या लोहा नगरपरिषदेच्या पराभवाचा बदला नांदेडच्या सिडको प्रभागात घेतला असे सांगितले. नांदेड-वाघाळा मनपा निवडणुकीत भाजपाने स्पष्ट वर्चस्व मिळवत सिडको प्रभागातील सर्व जागा जिंकल्या. राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांचा पराभव करत भाजपाने आपली ताकद दाखवून दिली, असे पवार म्हणाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पंतप्रधान नरेंद्र मोदी व माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली भाजपाला राज्यभर मोठे यश मिळाले असल्याचेही त्यांनी नमूद केले. भाजपाच्या विकासाभिमुख धोरणांमुळे जनता पक्षाच्या पाठीशी उभी राहिली असून आगामी सर्व निवडणुकांत विकासालाच मतदान करावे, असे आवाहन एकनाथ दादा पवार यांनी यावेळी केले.

# पर्यावरण रक्षणासाठी भूगोल दिन आवश्यक-डॉ.अर्चना वाघमारे

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**



माऊली विद्यापीठ केज, संचलित सरस्वती महाविद्यालय,भूगोल विभागाकडून भूगोल दिन साजरा करण्यात आला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.जी.बी. पाटील , प्रमुख पाहुणे डॉ. अर्चना वाघमारे यांची प्रमुख उपस्थिती होती सौरभ साळवे (पर्यावरण मित्र) डॉ.नागेश कराळे(भूगोल विभाग प्रमुख) यांची विचारमंचावर उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरुवात मान्यवरांच्या हस्ते पृथ्वीगोल ला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. प्रमुख पाहुण्या प्रा. डॉ. अर्चना वाघमारे यांनी भूगोल दिनाची सुरुवात, भूगोलशास्त्रज्ञ सी.डी देशपांडे यांचे भूगोल विषयातील योगदान आणि भूगोल दिनाच्या माध्यमातून सजीवांच्या अस्तित्वासाठी जनजागृती या विषयी सविस्तर असे मार्गदर्शन केले. पर्यावरण मित्र सौरभ साळवे यांनी, जागतिक तापमान वाढ पर्यावरणाचा ऱ्हास पर्यावरण प्रदूषण त्यातून निर्माण झालेली सजीव संबंध परिसंस्था मानवी आरोग्य याविषयी विविध संस्थांचे दाखले देत यासाठी आपली जबाबदारी आणि कर्तव्य याची जाणीव करून दिली. तसेच समृद्ध व स्वच्छ पर्यावरणासाठी स्वतःपासून सुरुवात करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन डॉ. नागेश कराळे यांनी केले. तर आभार डॉ. मधुकर चाटे यांनी मानले. कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थिनींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.


# राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाच्या बीड जिल्हा अध्यक्षपदी रंजित घाडगे

## केज तालुका अध्यक्ष पदी दिनकर जाधव यांची निवड

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

जय भारत हे घोषवाक्य घेऊन महाराष्ट्रासह संपुर्ण भारत देशात गेल्या आठ वर्षापासून पत्रकारांसाठी आणि पिडित, शोषित, वंचित घटकासाठी आविरत काम करणारा राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघ (भारत) या संघटनेची बीड जिल्हा अध्यक्ष, सचिव आणि केज तालुका कार्यकारणी जाहिर करण्यात आली.संस्थापक अध्यक्ष तथा संपादक विजय सुर्यवंशी यांच्या आदेशाने (दि.१५ जाने.) केज येथील शासकीय विश्रामगृह येथे कोअर कमिटी सदस्य दत्तात्रय मुजमुले आणि रंजीत घाडगे





यांच्या मार्गदर्शनाखाली बैठक संपन्न झाली. यावेळी दत्तात्रय मुजमले यांनी बीड जिल्हाध्यक्ष पदासाठी रंजीत घाडगे यांची फेर निवड करत अनिल वैरागे जिल्हा सचिव पदी, उपाध्यक्षपदी सुग्रिव क्षिरसागर यांची निवड करण्यात आली.

केज तालुका कार्यकारणी जाहीर करण्यात आली यामध्ये केज तालुका अध्यक्ष पदी दिनकर जाधव यांची निवड करण्यात आली, तर सचिव पदी सचिन भालेराव, कोषाध्यक्ष पदी मनोराम पवार, उपाध्यक्ष पदी जयद्रथ गायकवाड, सहसचिव पदी जयपाल रोकडे, उपाध्यक्षपदी किशोर गरुड यांची निवड करण्यात आली. निवड झालेल्या सर्व पदाधिकारी यांचे सर्व स्थरातुन अभिनंदन होत आहे.

# विद्यार्थ्यांच्या कलागुणांच्या विकासासाठी 'कर्मण्य महोत्सव' प्रभावी-अप्पर आयुक्त दिनकर पावरा

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**

विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या उपजत कलागुणांना योग्य व्यासपीठ मिळाल्यास त्यांचा सर्वांगीण विकास साधता येतो. अशा महोत्सवांमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो, असे प्रतिपादन आदिवासी विकास विभाग, नाशिक आयुक्तालयाचे अप्पर आयुक्त दिनकर पावरा यांनी केले. रांझणी (ता. तळोदा) येथील विद्यावर्धिनी निवासी आश्रमशाळेत श्री साईनाथ शिक्षण संस्थेच्या वतीने आयोजित तीन दिवसीय 'कर्मण्य महोत्सवाच्या' उद्धाटनप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार राजेश पाडवी होते.यावेळी सहाय्यक जिल्हाधिकारी अनय नावंदर यांनी उपक्रमाचे कौतुक केले, तर आमदार पाडवी यांनी क्रीडा क्षेत्रातील वाढत्या संधींबाबत मार्गदर्शन केले. महोत्सवात क्रीडा स्पर्धा, प्रबोधनात्मक व्याख्यान तसेच संस्थेच्या ३० वर्षांच्या प्रवासातील ५० यशस्वी माजी विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.



# महाराष्ट्राची ऐतिहासिक विजयगाथा,जनादेशाचा सन्मान-श्री शांत प्रकाशजी जाटव



दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

महाराष्ट्रात झालेल्या बीएमसीसह महानगर पालिका व नगर पालिकां च्या निवडणुकांमध्ये भारतीय जनता पार्टी व राष्ट्रवादी विचारधारेच्या तिच्या सहयोगी घटक पक्षांना प्रचंड बहुमताने मिळालेल्या विजयाबद्दल समस्त महाराष्ट्र वासीयां सह देशवासीयांनी आनंद व्यक्त केला आहे.या यशा बद्दल सर्वांना हार्दिक अभिनंदन व शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

या विजयामागे देवतुल्य कार्यकर्त्यांची अथक मेहनत,शिस्तबद्ध संघटन व निष्ठावान समर्पण महत्त्वाचे ठरले असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. तसेच विकास,सुशासन व राष्ट्रहिताच्या बाजूने स्पष्ट जनादेश देणाऱ्या नागरिकांचे आभार मानण्यात आले आहेत.


या निवडणूक निकालातून जात-धर्माच्या आधारे समाजात फूट पाडणाऱ्या राजकारणाला मतदारांनी ठाम नकार दिल्याचा संदेश मिळतो,असेही नमूद करण्यात आले. काँग्रेस,शिवसेना(उबाठा गट),राज ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील राजकारण तसेच समाजवादी पार्टी यांना अपेक्षित यश न मिळाल्याने महाराष्ट्राला विकासाभिमुख व स्थिर नेतृत्वाची अपेक्षा असल्याचे अधोरेखित झाले आहे.ही विजयगाथा तुष्टीकरण व नकारात्मक राजकारणाच्या पराभवाची असून राष्ट्रवाद,सुशासन आणि जनसेवेच्या विचारांची विजयपताका असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

या ऐतिहासिक विजया बद्दल भारतीय जनता पार्टी व तिच्या सर्व सहयोगी घटक पक्षांचे अभिनंदन करत जय लोकतंत्र,जय महाराष्ट्र असा जयघोष करण्यात आला आहे असे भारतीय जनता मजदुर संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री शांत प्रकाशजी जाटव यांनी म्हटले आहे.भारतीय जनता मजदुर संघाचे राष्ट्रीय सचिव भाऊसाहेब घोडके,महाराष्ट्र सचिव धनंजय कुलकर्णी, मराठवाडा सचिव चंद्रकांत पाटील यांच्या सह कार्यकर्त्यांनी महायुतीचे व मतदार बंधु भगिनी यांचे आभार मानले आहेत.

# साबला येथे स्वच्छता अभियान संपन्न

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील साबला येथे मुख्यमंत्री समृध्द पंचायत राज अभियान माझं गाव माझी मायभूमी निमित्त सरपंच जनाबाई नरहरी काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक १५ जानेवारी रोजी स्वच्छता अभियान राबवण्यात आले.यावेळी उपसरपंच श्रीमती कचराबाई राजेंद्र सरवदे तसेच ग्रामपंचायत सदस्य श्रीमती प्रतिभा काकडे, ज्ञानेश्वर पांचाळ,ग्राम पंचायत कर्मचारी गुलाब मुळे,विश्वनाथ नाईकनवरे तसेच जि.प.प्रा.शाळा, साबला मुख्याध्यापक धनंजय धाट,सहशिक्षक लोंढे.जि.प.प्रा.कटारे



वस्ती,साबला मुख्याध्यापक लोकरे सहशिक्षिका श्रीमती बनसोडे मॅडम,जि.प.प्रा. शाळा,आनंदवाडीवस्ती,साबला मुख्याध्यापक श्रीमती आंडिल मॅडम सहशिक्षक लांडगे तसेच शाळेतील सर्व विद्यार्थी व विद्यार्थीनी तसेच श्रीमती राधाबाई काकडे,राजेंद्र सरवदे यांच्यासह सर्वांनी मिळून साबला गावातील श्रीउत्तरेश्वर महाराज जागृत्त देवस्थान,श्री हनुमानमहाराज देवस्थान, श्री संतशिरोमणी सावता महाराज देवस्थानपरिसर, ग्रामपंचायत कार्यालय परिसर तसेच साबला गावातील सर्वत्र ठिकाणी स्वच्छता मोहिम राबवण्याचे काम साबला येथील आदर्श सरपंच जनाबाई नरहरी काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

# अमृत व एमसीईडी आयोजित उद्योजकता शिबिराचा प्रमाणपत्र वितरण सोहळा संपन्न

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

अमृत व एमसीईडी यांच्या माध्यमातून केज येथे २१ नोव्हेंबर ते १६ डिसेंबर दरम्यान आयोजित उद्योजकता विकास प्रशिक्षण शिबिराचा प्रमाणपत्र वितरण कार्यक्रम दि. १७ जानेवारी रोजी पंचायत समिती सभागृहात पार पडला. या शिबिराचा लाभ लक्षित गटातील ३१ लाभार्थ्यांनी घेतला.

कार्यक्रमास जिल्हा प्रकल्प अधिकारी दत्तात्रय क्षीरसागर, अमृतचे जिल्हा उपव्यवस्थापक दिगंबर जोशी, छत्रपती राजर्षी शाहू बँकेचे शाखा व्यवस्थापक सर्जेराव जाधव, वैद्यनाथ सहकारी बँकेचे संचालक प्रवीण देशपांडे, भाजप मजदूर संघाचे प्रदेश सचिव धनंजय कुलकर्णी आदी उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना प्रवीण देशपांडे यांनी उद्योजकाने प्रयत्नशील राहिल्यास बँक निश्चितपणे कर्ज देते असे सांगितले. तर दत्तात्रय क्षीरसागर यांनी व्यवसाय उभारणी, प्रकल्प अहवाल व बँक व्यवहार याबाबत लाभार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आल्याचे स्पष्ट केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिवराज मुथळे व सचिन जोशी यांनी केले.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077